**Publication: Sakal** **Date: Monday, 2nd February, 2015**

**Edition: Mumbai**

# कर्नाटकचा प्लास्टिक रोड मुंबईत आणता येईल

## विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचे नावीन्यपूर्ण आविष्कार

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १ : 'प्लास्टिक रोड' संकल्पनेवरचा प्रकल्प मुंबईत कसा राबवता येईल? फळे, भाज्या थेट ग्राहकांपर्यंत रास्त दरात कशा पोचवता येतील? झोपडपट्ट्या आणि अन्य गरीब वस्त्यांतील नागरिकांना चांगले अन्न कमी दरात कसे देता येईल? ग्रामीण भागातील कला-कारागिरीला जागतिक बाजारपेठ कशी मिळवून देता येईल? या विषयीच्या अनेक नावीन्यपूर्ण कल्पना विद्यार्थ्यांनी मांडल्या. निमित्त होते इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सने राबवलेल्या 'हॅपी इंडिया प्रोजेक्ट'चे.

इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सने 'हॅपी इंडिया प्रोजेक्ट' राबवला होता. त्यात निवडल्या गेलेल्या सर्वोत्तम २५ गटांमध्ये मुंबईच्या पाच गटांचा समावेश आहे. प्लास्टिकमुक्त समाज, कचऱ्याची योग्य विल्हेवाट, नोकऱ्यांमधील संधींपासून फळ-भाज्यांच्या रास्त दरातल्या मार्केटिंग फंड्यांपर्यंत अनेक संकल्पना या गटांनी सुचवल्या आहेत. रायन इंटरनॅशनल, पोदार इंटरनॅशनल स्कूल, डी. जी. खेतान इंटरनॅशनल स्कूल, बी. के. गाडिया 'ए' लेव्हल ज्युनिअर कॉलेज या मुंबईच्या शाळांमधील प्रकल्पांची निवड झाली आहे. हे सर्व विद्यार्थी ११ ते १६ वर्षे वयोगटातले आहेत. प्रत्येक टीमला ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. या रकमेतून मुलांच्या या संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करण्याची संधी दिली जाणार आहे.

### शाळा आणि कल्पना

रायन इंटरनॅशनल शाळा : मुळचा कर्नाटकचा असणारा प्लास्टिक रोड या संकल्पनेवरचा प्रकल्प मुंबईत कसा आणता येईल, याबाबत विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

पोदार इंटरनॅशनल स्कूल : आरोग्यवर्धक फळे आणि भाज्यांच्या विक्रीतील मार्केटिंगच्या साखळीला फाटा देऊन ते थेट ग्राहकापर्यंत रास्त दरात पोहोचवणे, झोपडपट्ट्या आणि अन्य वस्त्यांमधील गरिबांपर्यंत रास्त दरात चांगले अन्न पोहोचवणे.